# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),गडचिरोली यांचे कार्यालय.

वन प्रशासकीय भवन, पोटेगांव रोड, गडचिरोली-442605 (महाराष्ट्र)
दुरध्वनी क्र. 07132-233184 फॅक्स क्र. 07132-233187 Email-ccftgadchiroli@maforest.gov.in

क्रमांक ,कक्ष-3(1)/तेंदु/विक्री/ 609 गडचिरोली, दिनांक :- 30/5/2025

प्रति,

उप वनसंरक्षक,
सिरोंचा / आलापल्ली, वनविभाग.

विषय :- माहे जुन/2025 करीता इमारती माल, जळाऊ बिटे व लांब बांबू वनोपजाचे लिलावाचे आयोजन करणे बाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-3(1)/तेदू/विक्री/ 522 दिनांक 21.05.2025

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये माहे जुन/2025 या महिण्यात गडचिरोली वनवृत्तातील इमारती मालाचे ई-लिलाव करीता खालीलप्रमाणे विभागनिहाय लिलाव तारखा आवंटीत करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | वनविभाग | इतर किसम इमारती करीता | साग इमारती करीता | जळाऊ बिटे व बांबू करीता |
|---|---|---|---|---|
| 1 | वडसा | दि. 2 जुन पुर्ण दिवस | दि. 11 जुन सकाळी 9.00 ते 2.30 पर्यत | दि. 2 जुन पुर्ण दिवस |
| 2 | गडचिरोली | दि. 30 जुन पुर्ण दिवस | दि. 18 जुन पुर्ण | दि. 18 जुन पुर्ण |
| 3 | आलापल्ली | दि. 3 ते 6 जुन पुर्ण दिवस | दि. 12 व 13 जुन पुर्ण दिवस | दि. 3 ते 6 जुन पुर्ण दिवस (जळाऊ व बांबू) |
| 4 | सिरोंचा | दि. 7, 9 व 10 जुन पुर्ण दिवस | दि. 16 व 17 जुन पुर्ण दिवस | दि. 9 व 10 जुन पुर्ण दिवस |
| 5 | भामरागड | दि. 2 जुन दुपारनंतर | दि. 11 जुन दुपारनंतर | दि. 2 जुन दुपारनंतर |

उपरोक्त प्रमाणे सिरोंचा वनविभागातील इतर किसम वनोपज विक्री करीता दिनांक 7 व 9,10 जुन अशा तारखा आवंटीत करण्यात आलेल्या आहेत. परंतु दिनांक 7 जुन रोजी **"बकरी ईद"** शासकिय सुट्टी असुन. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-16/ए-2/ई.ऑ.मुद्दे/प्र.क्र.10/(21-22)/436 दिनांक 06 ऑगष्ट, 2021 अन्वये रविवार आणि इतर शासकिय सुट्टीचे दिवस वगळून ई-लिलाव तारखा निश्चित करावे अशा सुचना आहेत. त्यामुळे दिनांक 7 जुन रोजी **"बकरी ईद"** शासकिय सुट्टीचे दिवशी ई-लिलाव घेता येणार नाही म्हणुन दिनांक 7 जुन रोजीचे ई-लिलाव रद्द करण्यात येत आहेत. तरी उपवनसंरक्षक, सिरोंचा यांनी याबाबत नोंद घेऊन उर्वरीत तारखेप्रमाणे लिलावाचे आयोजन करावे.

आलापल्ली वनविभागातील बांबूचे ई-लिलाव करीता दि. 6 जुन ही तारीख आवंटीत करण्यात आली होती. परंतु उपवनसंरक्षक, आलापलली यांचे पत्र क्रमांक 196 दि. 30.05.2025 अन्वये विनंती केल्यानुसार बांबू लिलावाकरीता **दिनांक 6 जुन ऐवजी दिनांक 13 जुन** ही तारीख आवंटीत करण्यात येत आहे. तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-16/ए-2/प्र.क्र.34/भाग-4/ 297 दिनांक 28 मे, 2025 अन्वये आलापल्ली वनविभाग अंतर्गत विक्री डेपो घोट व आलापल्ली येथे ई-लिलावात तहकुब असलेला वनोपज मैदाणी/खुले लिलावात विक्री करणेसाठी मैदानी/खुले लिलाव घेण्यास मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने खुले लिलाव घेणेसाठी दिनांक 14 व 19 जुन/2025 अशी तारीख आवंटीत करण्यात येत आहे. तरी उपवनसंरक्षक, आलापल्ली यांनी सदरील बदलाची नोंद घेवून त्याप्रमाणे लिलावाचे आयोजन करावे.

(एस. रमेश कुमार)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
गडचिरोली.

प्रतिलीपी :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
प्रतिलीपी :- एनआयसी. समन्वयक, निर्देशन विभाग, गडचिरोली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित